# प्रधानमंत्री जन-धन योजना

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

प्रधानमंत्री जन-धन योजना
माझे खाते भाग्य विधाते

## आपल्याला बँक बचत खाते का उघडायला हवे ?

बँकेत पैसे व्याजासह सुरक्षित राहतात.
बँकेत जमा असलेल्या रकमेवर आपल्याला व्याज मिळते.
आपण आपल्या सोयीनुसार केव्हाही (२४ तास अखंड सेवा) पैसे काढू शकतो.
आपण बँकेत खाते उघडल्यावर कर्जे व ठेवी यांसारख्या सुविधांचा लाभ घेऊ शकता.

## मूलंभूत बचत खात्याचे काय फायदे आहेत?

बचत खाते सुरुवातीला शून्य रकमेने उघडू शकता. सुरुवातीला कोणत्याही प्रारंभिक ठेवीची गरज नाही. आपण आपल्याला आवश्यक असेल तेव्हा बँकेत रक्कम जमा किंवा काढू शकता. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही.

## आपण आपले एटीएम / डेबिट (RuPay) कार्ड कसे वापरू शकता?

आपणांस एक एटीएम /RuPay कार्ड खाते उघडतांना देण्यात येईल. आपल्या इच्छेनुसार आपण आपले पैसे कोणत्याही बँकेच्या कोणत्याही एटीएम मधुन (२४ तास अखंड सेवा ) काढू शकता. ह्या कार्डाचा वार करुन आपण वस्तुंची खरेदी ही करु शकता. या व्यतिरीक्त, या कार्डवर रु १ लाखाचे विमा कवच उपलब्ध आहे.

## या खात्यात इतर सुविधा काय आहेत?

आपल्या ६ महिन्याच्या समाधानकारक व्यवहारानंतर , बँक ओव्हरड्राफ्ट सुविधा देऊ शकेल ज्याची सुरुवात रु. १000/- ने होईल व नियमित व्याज जमा केल्यास ती रक्कम रुपये ५000/- पर्यंत वाढविण्यात येईल .

## खाते उघडल्यानंतर इतर उत्पादनांचा लाभ घेऊ शकता

मुदत आणि आवर्ती ठेवी
किसान क्रेडिट कार्ड
शेती, बी-बियाणे, दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, लघु (सुक्ष्म) उद्योग, ट्रॅक्टर कर्ज आणि इतर कर्ज सुविधा व पैसे ट्रान्सफर इ.

## माझ्या आधार क्रमांका सोबत माझे बचत खाते जोडू शकतो का?

हो, आधार क्रमांक बचत बँक खात्याला जोडला जाऊ शकतो आणि त्या आधारे वृद्ध, अपंग व विधवांसाठी पेन्शन,शिष्यवृत्ती इ. एलपीजी, मनरेगा सबसिडी मजुरी थेट आधार नंबर वरुन खात्यात थेट जमा केली जाऊ शकतात. त्यासाठी आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न करणे, तसेच संबंधित शासकीय विभागाकडे नोंदविणे आवश्यक आहे.

## खाते उघडण्यासाठी लागणारी कागदपत्रे काय आहेत?

खाते उघडणे सोपी प्रक्रिया आहे. फक्त फोटो, निवासी पत्याचा पुरावा आवश्यक आहे. आपण मतदानाचे कार्ड, जॉब कार्ड, आधार कार्ड, वाहन चालक परवाना, पासपोर्ट, टेलिफोन बिल किंवा सरपंचांचे पत्र सादर करू शकता.